प्रेस प्रकाशनी PRESS RELEASE

भारतीय रिज़र्व बैंक
RESERVE BANK OF INDIA
वेबसाइट : www.rbi.org.in/hindi
Website : www.rbi.org.in
इ-मेल email: helpdoc@rbi.org.in

संचार विभाग, केंद्रीय कार्यालय, एस.बी.एस.मार्ग, मुंबई-400001
DEPARTMENT OF COMMUNICATION, Central Office, S.B.S.Marg, Mumbai-400001
फोन/Phone: 91 22 2266 0502 फैक्स/Fax: 91 22 22660358

मे 12, 2016

**जळगाव डिस्ट्रिक्ट सहकारी बँक लि., जळगाव, महाराष्ट्र**
**ह्यांना आरबीआयकडून दंड लागु**

बँकिंग विनियामक अधिनियम 1949 (सहकारी सोसायट्यांना लागु असलेला) च्या कलम 46(4) सह वाचित कलम 47अ(1)(ब) अन्वये तिला मिळालेल्या अधिकाराचा वापर करुन भारतीय रिझर्व बँकेने, जळगाव डिस्ट्रिक्ट सहकारी बँक लि., जळगाव, महाराष्ट्र ह्यांना, रु.2.00 लाख (रुपये दोन लाख) दंड लावला असून तो दंड, वरील बँकेचे त्यावेळी असलेल्या संचालकांचे हितसंबंध असलेल्या, जळगाव स्टार्च फॅक्टरीला बँकेला येणे असलेल्या कर्जांवर सूट देण्याबाबत, आरबीआयची पूर्व परवानगी न घेता, बी आर अधिनियमाच्या कलम 20अ चे उल्लंघन केल्याबाबत लावण्यात आला आहे.

ह्याबाबत रिझर्व बँकेने दिलेल्या कारणे दाखवा नोटिसीला वरील बँकेने लेखी उत्तर दिले. ह्या प्रकरणातील सत्य गोष्टी व वरील बँकेने दिलेले उत्तर विचारात घेता, बँकेने निर्णय घेतला की उल्लंघन सिध्द झाले असून त्याबाबत दंड होणे आवश्यक आहे.

**अजित प्रसाद**
सहाय्यक सल्लागार

**वृत्तपत्र निवेदन : 2015-2016/2645**